# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १ मार्च, २०१८

## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री प्रशांत ठाकूर, किसन कथोरे, संजय केळकर, योगेश सागर, अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नेहरुनगर (सांताक्रुझ-वाकोला, मुंबई) परिसरातील फेरीवाल्यांनी मुंबई महापालिकेच्या पथकाची कारवाई टाळण्यासाठी भाज्यांच्या गोण्या नाल्यात लपवल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, गटारात लपवलेला भाजीपाला नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरु शकत असल्यामुळे पालिकेने त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्याचा निर्णय घेऊन १५ दिवस उलटूनही कोणतीच कारवाई करण्यात न येणे, मुबंईतील भाजीपाले विक्रेते भाजीपाला गटारात ठेवून ग्राहकांना विक्री करत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येवून मोठ्या प्रमाणात निर्माण होत असलेले आजार, याप्रकरणी फेरीवाले व अधिकारी, कर्मचारी यांचे संगनमत असल्याच्या निर्माण झालेला संशय, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता मुंबई शहर व परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी स्वच्छ भाजीपाला पुरविण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सुनिल प्रभु, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, श्री. बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, अमिन पटेल, अस्लम शेख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. त्र्यंबक भिसे, गणपत गायकवाड, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, प्रा. मेधा कुलकर्णी, सर्वश्री. योगेश सागर, संजय केळकर, ॲड. आशिष शेलार, श्री. किसन कथोरे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. दिपक चव्हाण, बाळासाहेब पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

‘‘मुंबईसह राज्यातील खासगी विना अनुदानित शाळांमध्ये सन २०१२ पासून शिक्षण

हक्क कायदयानुसार २५ टक्के राखीव कोटयातून राबविण्यात येत असलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये केवळ २४-२५ टक्केच दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, गतवर्षी मुंबईतील ३३४ शाळांमधील सुमारे ८,५९३ जागा शिल्लक राहणे, खासगी शाळांचे शुल्क, जास्त असून ती भरणे सर्वसामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर असल्याने विद्यार्थ्यांना सवलतीच्या प्रवेशापासून वंचित रहावे लागणे, काही शाळा कोटयातील उपलब्ध जागा जाहीर करीत नसणे, राखीव कोटयातून प्रवेश घेतल्यास केंद्र शासन ६० टक्के तर राज्य शासन ४० टक्के प्रमाणे विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम शाळांना देत असल्याची माहिती अद्यापही सामान्य पालकांपर्यंत पोहोचली नसणे, शाळांनी राखीव कोटयातून प्रवेश देण्यासाठी शासनाकडे नोंदणी केली नसल्यामुळे त्यांची चौकशी करुन त्यांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, त्यातच ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दुर करण्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राखीव कोटयातून प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपुर्तीची गत ५ वर्षापासूनची सुमारे ८०० कोटीहून अधिक रुपयांची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही न केल्याने थकित रक्कम शासनाकडून मिळेपर्यंत फेडरेशन ऑफ स्कूल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेने २५ टक्के राखीव कोटयातून प्रवेश न देण्याचा दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी शासनास दिलेला इशारा, परिणामी राज्यातील दुर्बल व वंचित घटकातील लाखो विद्यार्थ्यांना खाजगी विना अनुदानित शाळामधील प्रवेशापासून वंचित रहावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''

(३) **सर्वश्री. अस्लम शेख, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, अब्दुल सत्तार, श्रीमती निर्मला गावित, डॉ. संतोष टारफे, श्री. मो. आरिफ नसीम खान, प्रा. वर्षा गायकवाड, प्रा. विरेंद्र जगताप, श्री. कालीदास कोळंबकर, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, अमर काळे, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. बाळासाहेब थोरात, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, अमित देशमुख, भारत भालके, कुणाल पाटील, हर्षवर्धन सपकाळ, डी.पी. सावंत, योगेश सागर, विजय काळे, उल्हास पाटील, अजय चौधरी, सुनिल प्रभु, राजन साळवी, प्रकाश फातर्पेकर, संजय पोतनीस, सुनिल राऊत, डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ९७ हजार अंगणवाडयांमधील सुमारे ७३ लाख बालकांना आणि तीन लाख गर्भवती महिलांना पोषण आहार दिला जात असणे, सुमारे ३० हजार बचतगटांच्या माध्यमांतून यासाठी अंगणवाडयांना डाळ, तांदूळ, रवा, तेल, आदी शिधापुरवठा केला जात असणे, शासनाने गेले आठ महिने बचतगटांचे पोषण आहाराचे सुमारे ८०० कोटी रुपये न दिल्यामुळे राज्यातील अंगणवाडयांमधील लाखो बालकांचा खिचडी, उपमा आदी पोषण आहार बंद पडण्याची वेळ आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या सुमारास निदर्शनास

येणे, गडचिरोलीसह काही आदिवासी जिल्हयांमधील अंगणवाडयांमध्ये गत काही दिवसांपासून पोषण आहार देणे बंद करण्यात आल्यामुळे लाखो बालकांवर आलेली उपासमारीची वेळ, शिधापुरवठा बंद केल्यामुळे अंगणवाडयामधील शून्य ते सहा वयोगटाची बालके उपाशी राहू लागली असणे, पोषण आहारासाठी ४०० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर होऊनही त्या वितरीत करण्यात न आल्याने पालकांमध्ये व गर्भवती महिलांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**चार : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री.हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख,अजित पवार, जितेंद्र आव्हाड,शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, दिलीप वळसे-पाटील, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, आसिफ शेख, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, श्री.पंकज भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ – महाराष्ट्र

नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमित झनक, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, अजित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-

कुपेकर, सर्वश्री. संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, आसिफ शेख, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, सर्वश्री.पंकज भुजबळ, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमित झनक, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा

नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अजित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, श्री.पंकज भुजबळ वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**पाच : डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, सुरेश धानोरकर, संजय सावकारे, डॉ. संजय रायमुलकर, श्री संतोष दानवे, डॉ.शशिकांत खेडेकर, सर्वश्री सुधीर पारवे, सुभाष साबणे, विकास कुंभारे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर कोहळे, संदीपान भुमरे, कृष्णा गजबे, राजाभाऊ वाजे, विजय रहांगडाले, अनिल कदम, चरण वाघमारे, योगेश घोलप, उन्मेश पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. आर.टी.देशमुख, सुरेश गोरे, ॲडः गौतम चाबुकस्वार, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री नारायण पाटील, सुधाकर भालेराव, प्रकाश आबिटकर, किर्तीकुमार भांगडिया, अनिल बाबर, रणधीर सावरकर, राजेश क्षीरसागर, गोवर्धन शर्मा, डॉ.मिलिंद माने, सर्वश्री मंगेश कुडाळकर, भिमराव धोंडे, समीर कुणावार, शिवाजीराव कर्डिले, बाळासाहेब मुरकुटे, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री बाळासाहेब सानप, संजय केळकर, डॉ. राहुल आहेर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात जालना, परभणी, बुलढाणा, बीडसह मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये दिनांक ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास गारपीटीचा प्रचंड तडाखा बसणे तसेच विदर्भातील काही भागात वीज कोसळून ७ जणांचा बळी गेल्याचे व १६ जण जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, तूर, हरभरा, गहू, ज्वारी ही काढणीला आलेली पिके आकस्मिकरित्या गारांच्या तडाख्यात सापडल्याने भुईसपाट होणे, संत्रा आणि द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, या भागातील शेतकऱ्यांनी मेहनत करून उभी केलेली पिके मातीमोल होणे, विशेषत: विदर्भातील बोंडअळीमुळे कापूस पिक गमावलेल्या शेतकऱ्यांचा गारपीटीमुळे हातातोंडाशी आलेला पिकांचा घास गेला असल्याचे व शेतकऱ्यांची लाखो रुपयांची पीकहानी झाली असल्याचे आढळून येणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या हानी झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आणि विमा कंपन्यांना आकडेवारी सादर करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले असणे, याबाबत शासनाने कार्यवाही करून गारपीटग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, अबु आझमी, अमिन पटेल, सुनिल केदार, दिलीप सोपल, गोपालदास अग्रवाल, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री मो. आरिफ नसिम खान, डी. एस. अहिरे,**

**राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, काशीराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसीफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबक भिसे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, दिपक चव्हाण, पंकज भुजबळ, श्रीमती सुमनताई पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"फसवी कर्जमाफी व कर्जमाफीच्या अंमलबजावणीत झालेल्या घोटाळयामुळे राज्यातील हतबल झालेला शेतकरी, परिणामी आत्महत्या कमी न होता त्या वाढत जाणे, मावा व तुडतुडा यासारख्या किडींमुळे धान पिकाचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, गुलाबी बोंड अळीमुळे ३० लाख हेक्टरवरील बाधित झालेले कापसाचे क्षेत्र, सदर नुकसानीचे सर्वेक्षण होऊन अद्यापही शेतकरी मदतीपासून वंचित राहणे, यवतमाळ जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात किटकनाशक फवारणीमुळे ५६ शेतकरी मृत होऊनही बियाणे कंपन्यांवर शासनाकडून कोणतीही कारवाई न होणे, दिनांक १० ते १३ फेब्रुवारी, २०१८ या काळात विदर्भ, मराठवाडा व खान्देशात झालेल्या गारपिटीमुळे दोन लाख हेक्टरवरील रब्बी पिकाच्या नुकसानीबरोबर मोठ्या प्रमाणात झालेली जिवीतहानी व पशुधनाचे झालेले नुकसान, पीक विमा ऑनलाईन भरण्याची करण्यात आलेली सक्ती, तथापि, विमा कंपनीकडून दावे मंजूर होत नसल्यामुळे ग्रामीण भागात असंख्य शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, जलयुक्त शिवार योजनेतील घोटाळयांमुळे ठरविलेले जलसाठ्यांचे उद्दिष्ट अद्यापही न पूर्ण होणे, सिंचन क्षमतेत वाढ झाल्याची दिशाभूल करणारी आकडेवारी, गेल्या तीन वर्षात ३०७ सिंचन प्रकल्पांसाठी ४० हजार कोटी रुपयांच्या देण्यात आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यता, राज्यातील रस्त्यांची झालेली दूरवस्था, घोषणा करुनही अद्यापपावेतो रस्ते खड्डेमुक्त न होणे, संपूर्ण राज्य व ग्रामीण भागात रस्त्यांची दूरवस्था झालेली असताना दुरुस्तीच्या नावाने एएमसी करुन मोठ्या प्रमाणात अदा करण्यात येणारी देयके, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, समृध्दी महामार्गासाठी शेतकऱ्यांचा विरोध डावलून सक्तीने जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, संपादित जमिनीचा मिळणारा अल्प मोबदला, याबाबत गावापासून मंत्रालयापर्यंत हेलपाटे मारुनही न्याय न मिळाल्याने ८४ वर्षीय धर्मा पाटीलसारख्या शेतकऱ्याने मंत्रालयात येऊन केलेली आत्महत्या, धानाला २००/- रुपये प्रति क्विंटल बोनस आणि नापेर क्षेत्रातील रोपवाटीकेला एनडीआरएफ चे १३,५००/- रुपये देण्याची दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी केलेली घोषणा, याबाबत अद्याप कोणताही आदेश न निघाल्याने त्याची अंमलबजावणी न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १ व २)**

(१) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाने मुंबई शहरास स्मार्ट सिटी म्हणून घोषित करणे, स्मार्ट सिटी अंतर्गत देण्यात येत असलेल्या सुविधांमध्ये परिवहन सुविधा महत्वाची असून गत १५ वर्षात २७६६.७० कोटी रुपये इतका तोटा झाला असून बेस्ट उपक्रमावर तेवढेच कर्ज असणे, सदर कर्जाची परतफेड वेळेत न झाल्यास हा उपक्रम बंद होण्याची भिती, बेस्ट उपक्रम बंद झाल्यास ४६ हजार कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीचे संकट निर्माण होण्याची शक्यता, सबब, दिल्ली व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमास सहाय्यनिधी देऊन नव संजिवनी देण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **डॉ. मिलिंद माने, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर महानगरपालिकेने कामगारनगर, नारी सिंग रोड, नागपूर येथे आयसोलेशन रुग्णालयासाठी जागा निश्चित करणे, नागपूर येथील रुग्णालयात गॅस्ट्रो व इतर रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत असून इमामवाडा येथे एकमेव रुग्णालय असून त्याची रुग्णक्षमता अल्प प्रमाणात असल्यामुळे अनेक रुग्णांचा उपचाराअभावी झालेला मृत्यू, त्यामुळे नागपूर शहरात आयसोलेशन रुग्णालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.